# Mr. Baba Kalyani's Inaugurates Hospital

**MEDIA DOSSIER**

**April 23, 2022**

**Print Coverage**

| No. | Publication/Portal | Headline | Date |
|---|---|---|---|
| 1 | Prabhat | Mr. Baba Kalyani’s Inaugurates Hospital | April 23, 2022 |
| 2 | Loksatta | Mr. Baba Kalyani’s Inaugurates Hospital | April 23, 2022 |
| 3 | Maharashtra Times | Mr. Baba Kalyani’s Inaugurates Hospital | April 23, 2022 |
| 4 | Pudhari | Mr. Baba Kalyani’s Inaugurates Hospital | April 23, 2022 |
| 5 | Sandhyanad | Mr. Baba Kalyani’s Inaugurates Hospital | April 23, 2022 |

| Headline: Mr. Baba Kalyani's Inaugurates Hospital | Publication : Prabhat |
|---|---|
| Date : April 23, 2022 | Edition: Pune |

# देशसेवेच्या कामात तरुणांनी योगदान देण्याची गरज

## सरसंघचालक भागवत यांचे प्रतिपादन



**हडपसर/पुणे, दि. २२ (प्रतिनिधी)** - डॉ. दादा गुजर हे समाजशील व त्यागी होते. यामुळे समाजातील वेदना व भावना समजु शकले. यातुन महाराष्ट्र आरोग्य मंडळाच्या साने गुरुजींच्या विचाराचे काम व आरोग्य क्षेत्रात आदर्शदायी काम पूर्ण होऊ शकले. ध्येय प्रेरित व्यक्तीकडे पाहुन देशसेवेच्या कामात तरुणांनी योगदान देण्याची गरज आहे. माणसाकडे परदु:ख कातरता ही एक देणगी आहे. त्या प्रेरणेतून दादांनी हे काम उभे केले आहे. दादा गुजर यांच्यानंतर अनिल गुजर यांनी हे काम सुरू ठेवले आहे. ज्यांच्या करता सेवा केली जाते त्यांच्यातही हा सेवाभाव उतरताना पाहायला मिळत आहे, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी व्यक्त केले.

भारत सरकारच्या आयुष मंत्रालयाच्या अनुदानातून उभारलेल्या महाराष्ट्र आरोग्य मंडळ संचलित डॉ. दादा गुजर माता-बाल रुग्णालयाचे उद्घाटन सरसंघचालक डॉ. भागवत यांच्या हस्ते झाले, त्यावेळी ते बोलत होते. भारत फोर्जचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक बाबा कल्याणी तसेच सुनिता कल्याणी यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. आरोग्य मंडळाचे सचिव अनिल गुजर यांनी प्रास्ताविक केले.

आर्किटेक्ट दिलीप काळे, बांधकाम व्यावसायीक राजन मडकर, मनोज भावसार, प्रकल्प समन्वयक डॉ. प्रणिता देशमुख, डॉ. सुशीलकुमार देशमुख यांचा विशेष सत्कार करण्यात आला. संस्थेचे अध्यक्ष डॉ. एस. एफ. पाटील, उपाध्यक्ष सतीश आगरवाल उपस्थित होते. डॉ. राजेश पवार यांनी आभार मानले. स्नेहल दामले यांनी सूत्रसंचलन केले.

| Headline: Mr. Baba Kalyani's Inaugurates Hospital | Publication : Loksatta |
|---|---|
| Date : April 23, 2022 | Edition: Pune |

# समाजाचे प्रत्येक अंग आज अस्वस्थ

## सरसंघचालक मोहन भागवत यांचे मत



महाराष्ट्र आरोग्य मंडळ संचलित डॉ. दादा गुजर माता-बाल रुग्णालयाचे उद्घाटन मोहन भागवत यांच्या हस्ते शुक्रवारी झाले. त्यानिमित्त आयोजित कार्यक्रमात डॉ. एस. एफ. पाटील आणि अनिल गुजर यांच्या हस्ते भागवत यांचा सत्कार करण्यात आला. बाबा कल्याणी, सुनीता कल्याणी आणि सतीश आगरवाल या वेळी उपस्थित होते.

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** समाजाचे प्रत्येक अंग आज स्वस्थ नाही, असे मत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी शुक्रवारी व्यक्त केले. ही अस्वस्थता दूर करण्यासाठी ज्ञान आणि कुशल कर्माबरोबरच आपलेपणाच्या भावाने केलेल्या सेवेची खूप गरज आहे. समाज सशक्त करणाऱ्या कार्यास बळ दिले तरच बलशाली देश घडेल, असेही ते म्हणाले.

भारत सरकारच्या आयुष मंत्रालयाच्या अनुदानातून उभारलेल्या महाराष्ट्र आरोग्य मंडळ संचलित डॉ. दादा गुजर माता-बाल रुग्णालयाचे उद्घाटन भागवत यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. भारत फोर्जचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक बाबा कल्याणी आणि सुनीता कल्याणी, महाराष्ट्र मंडळाचे अध्यक्ष डॉ. एस. एफ. पाटील, उपाध्यक्ष सतीश आगरवाल आणि सचिव अनिल गुजर या वेळी उपस्थित होते.

भागवत म्हणाले, आयुर्वेद, ॲलोपॅथी, होमिओपॅथी अशा विविध चिकित्सापद्धती एकाच ठिकाणी उपलब्ध करून दिल्या गेल्या, तर सुलभ आणि परवडणाऱ्या दरात उपचार मिळणे शक्य होईल. सध्या उपचारांवर मोठा खर्च करावा लागतो. त्याचा ताण रुग्ण आणि त्याच्या कुटुंबीयांवर येतो. आयुर्वेदात 'इलनेस' बरोबरच 'वेलनेस' चाही विचार केला गेला आहे.

'खरा तो एकचि धर्म जगाला प्रेम अर्पावे' या साने गुरुजी यांच्या विचारांवर संस्था कार्यरत आहे. करुणा हे धर्माचे मूळ तत्त्व आहे. माणसाकडे परदुःख कातरता ही एक देणगी आहे. त्या प्रेरणेतून दादा गुजर यांनी हे काम उभे केले आहे. त्यांच्यानंतर अनिल गुजर यांनी हे कार्य सुरू ठेवले आहे, अशी कामे वाढली पाहिजेत. एकमेकांना सहकार्य करीत सर्वांना उभे करण्याचे काम झाले पाहिजे, असेही भागवत यांनी सांगितले.

बाबा कल्याणी म्हणाले, डॉ. दादा गुजर यांच्या माध्यमातून आदिवासी आणि ग्रामीण भागात मोठे काम उभे राहिले आहे. सामान्यांना परवडणारी गुणवत्तापूर्ण आणि सुलभ सेवा देण्याचे काम मंडळ अविश्रांतपणे करत आहे.

डॉ. पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. अनिल गुजर यांनी प्रास्ताविक केले. स्नेहल दामले यांनी सूत्रसंचालन केले.

| Headline: Mr. Baba Kalyani's Inaugurates Hospital | Publication : Maharashtra Times |
|---|---|
| Date : April 23, 2022 | Edition: Pune |

# 'आरोग्यसेवा व्हाव्यात परिपूर्ण'

## 'डॉ. दादा गुजर माता-बाल रुग्णालया'चे डॉ. मोहन भागवत यांच्या हस्ते उद्घाटन

म. टा. प्रतिनिधी, हडपसर

'देश सक्षम करण्यासाठी शिक्षण व आरोग्य सुविधा परिपूर्ण करण्याची आवश्यकता आहे. साने गुरुजी यांच्या प्रेरणेतून डॉ. दादा गुजर यांनी हेच मोलाचे कार्य केले आहे. परिश्रम कसे करावेत, हे माणसाला नेमके समजले पाहिजे. ज्ञान आणि कर्माची सांगड घालून हे काम सुरू आहे. एका पिढीने हाती घेतलेले हे सेवाव्रत यापुढे अखंडित चालू राहावे,' अशी अपेक्षा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी शुक्रवारी व्यक्त केली.

हडपसर येथील महाराष्ट्र आरोग्य मंडळाच्या 'डॉ. दादा गुजर माता-बाल रुग्णालया'चे उद्घाटन भागवत हस्ते यांच्या हस्ते झाले. त्या वेळी ते बोलत होते. भारत फोर्स कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक बाबा कल्याणी, सुनीता कल्याणी, महाराष्ट्र आरोग्य मंडळाचे अध्यक्ष एस. एफ. पाटील, सचिव अनिल गुजर, उपाध्यक्ष सतीश अगरवाल या वेळी उपस्थित होते. केंद्र सरकारच्या आयुष मंत्रालयाच्या अनुदानातून डॉ. दादा गुजर माता बाल रुग्णालय इमारत उभी करण्यात आली आहे.

'एखादे काम थांबले; तर व्यवस्था विस्कळित होते. त्यामुळे प्रत्येकाचे काम समान आहे. आपल्या समाजाने केलेल्या सेवेची किंमत मोठी आहे. आपल्या देशातील समाजाने ही क्षमता दाखविण्याची गरज आहे. एकमेकांना सहकार्य करीत सर्वांना उभे केले पाहिजे,' असेही भागवत यांनी नमूद केले. 'आंबेगाव तालुक्यातील आदिवासी भागात महाराष्ट्र आरोग्य मंडळाच्या सहकार्याने सात वर्षांत विविध कामे केली आहेत. डॉ. गुजर यांच्या माध्यमातून आदिवासी व ग्रामीण भागांत मोठे काम उभे राहिले आहे. गुणवत्तापूर्ण व सुलभ सेवा देण्याचे काम येथे होत आहे,' अशा शब्दांत बाबा कल्याणी यांनी भावना व्यक्त केल्या. प्रास्ताविक अनिल गुजर यांनी केले. डॉ राजेश पवार यांनी आभार व्यक्त केले.



हडपसर येथे 'डॉ. दादा गुजर माता-बाल रुग्णालया'चे उद्घाटन सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांच्या हस्ते शुक्रवारी झाले. या वेळी बाबा कल्याणी उपस्थित होते.

### असे आहे रुग्णालय

या अत्याधुनिक रुग्णालयात ५० खाटा, आयसीयू, अत्याधुनिक उपकरणे, सुविधा निर्माण करण्यात आल्या आहेत. मुलांचे व मातेचे आरोग्य जपण्याचा प्रयत्न याद्वारे केला जाणार आहे. अत्याधुनिक आयुर्वेद व योगाद्वारे उपचार पद्धती करण्यात येणार आहे. हडपसर ग्रामीण भागात १९६०मध्ये अवघ्या चार खाटांचे रुग्णालय सुरू केले होते, ते आता २५० खाटांचे साने गुरूजी रुग्णालय झाले आहे. यासोबत गरीब मुलांसाठी शाळा व वैद्यकीय महाविद्यायालय उभारले. ग्रामीण भागांत पाणी जिरवा, कुटुंब नियोजन, बालकांचे लसीकरण केंद्र, आदिवासी भागातील नागरिकांचे राहणीमान उंचावणे यावर आम्ही सर्वजण काम करीत आहोत. या कामांसाठी सरकारी व निमशासकीय संस्थेने मदत केली आहे, अशी कृतज्ञता सचिव अनिल गुजर यांनी व्यक्त केली.

| Headline: Mr. Baba Kalyani's Inaugurates Hospital | Publication : Pudhari |
|---|---|
| Date : April 23, 2022 | Edition: Pune |

# जगाची अपेक्षा आपण पूर्ण करू शकतो

## सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांचे मत; डॉ. दादा गुजर माता-बाल रुग्णालयाचे उद्घाटन

**हडपसर / पुणे : पुढारी वृत्तसेवा**

'आपल्याकडील क्षमतेमुळे कोणत्याही परिस्थितीमध्ये आपण पुढे येऊ शकतो. जगाला आपल्याकडून काही मिळाले पाहिजे, अशी आवश्यकता असून ती आपण पूर्ण करू शकतो,' असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी केले.

केंद्र सरकारच्या आयुष मंत्रालयाच्या अनुदानातून उभारलेल्या महाराष्ट्र आरोग्य मंडळ संचालित डॉ. दादा गुजर माता-बाल रुग्णालयाचे उद्घाटन डॉ. भागवत यांच्या हस्ते शुक्रवारी माळवाडी, हडपसर येथे झाले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी भारत फोर्जचे व्यवस्थापकीय संचालक बाबा कल्याणी, त्यांच्या पत्नी सुनीता कल्याणी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तर संस्थेचे अध्यक्ष डॉ. एस. एफ. पाटील, उपाध्यक्ष सतीश आगरवाल आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.



**डॉ. दादा गुजर माता-बाल रुग्णालयाचे उद्घाटन डॉ. मोहन भागवत यांच्या हस्ते शुक्रवारी हडपसर येथे झाले. त्यावेळी उपस्थित मान्यवर.**

भागवत म्हणाले, ''आपण सबंध देश म्हणून उभे राहू शकतो, अशी अनुकूलता सध्या आहे. त्या अनुकूलतेचा लाभ घेणारा समाज उभा करायचा असेल तर समाजातील ही आत्मीयता आहे त्याची अभिव्यक्ती, आपलेपणातून केलेली ज्ञान आणि गुणवत्तेच्या दृष्टीने उत्कृष्ट आणि परिश्रमाच्या दृष्टीने परिपूर्ण अशी कामे उत्तरोत्तर होण्यासाठी आपण जितके सहाय्य या कामांना देऊ शकतो तितके आपण केले पाहिजे.''

डॉ. दादा गुजर यांच्या कार्याचे कौतुक डॉ. भागवत यांनी केले. ते म्हणाले की, डॉ. गुजर हे समाजशील व त्यागी होते. यामुळे समाजातील वेदना व भावना समजू शकले. यातून महाराष्ट्र आरोग्य मंडळाच्या साने गुरुजींच्या विचाराचे काम व आरोग्य क्षेत्रात आदर्श काम पूर्ण होऊ शकले. ध्येयप्रेरित व्यक्तीकडे पाहून देशसेवेच्या कामात तरुणांनी योगदान देण्याची गरज आहे. माणसाकडे परदु:ख कातरता ही एक देणगी आहे. त्या प्रेरणेतून दादांनी हे काम उभे केले आहे. दादा गुजर यांच्यानंतर अनिल गुजर यांनी ते सुरू ठेवले आहे. ज्यांच्याकरिता सेवा केली जाते त्यांच्यातही हा सेवाभाव उतरताना पाहायला मिळत आहे.

यावेळी आर्किटेक्ट दिलीप काळे, बांधकाम व्यावसायिक राजन मडकर, मनोज भावसार, प्रकल्प समन्वयक डॉ. प्रणिता देशमुख, डॉ. सुशीलकुमार देशमुख यांचा विशेष सत्कार करण्यात आला. आरोग्य मंडळाचे सचिव अनिल गुजर यांनी प्रास्ताविक केले.

### समाजवादी कार्यकर्त्यांची पाठ

साने गुरुजींच्या समाजवादी विचारांनी प्रेरित होऊन डॉ. दादा गुजर व इतर मंडळींनी महाराष्ट्र आरोग्य मंडळ ही संस्था स्थापन केली. तेव्हापासून या संस्थेवर समाजवादी विचारांचा आणि नेत्यांचा वरचष्मा आहे. मात्र, या समाजवाद्यांच्या बालेकिल्ल्यात प्रथमच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे मोहन भागवत यांना आणल्याने समाजवादी विचारांच्या नेत्यांनी व कार्यकर्त्यांनी या कार्यक्रमाकडे पाठ फिरविल्याचे पाहायला मिळाले.

| Headline: Mr. Baba Kalyani's Inaugurates Hospital | Publication : Sandhyanand |
|---|---|
| Date : April 23, 2022 | Edition: Ahmedabad |

# समाज सशक्त करणाऱ्या कार्यास बळ देणे गरजेचे

## डॉ. मोहन भागवत यांचे प्रतिपादन : डॉ. दादा गुजर माता बाल रुग्णालयाचे उद्घाटन

**पुणे, २३ एप्रिल (आ.प्र.) :**

समाजाचे प्रत्येक अंग आज स्वस्थ नाही. त्यामुळे समाजाचे प्रत्येक अंग स्वस्थ बनून समाज सशक्त करणाऱ्या कार्यास बळ देणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी केले.

हडपसरमधील महाराष्ट्र आरोग्य मंडळाच्या डॉ. दादा गुजर माता बाल रुग्णालयाचे उद्घाटन डॉ. भागवत यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. ज्येष्ठ उद्योगपती आणि भारत फोर्जचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक बाबा कल्याणी, त्यांच्या पत्नी सुनीता कल्याणी, महाराष्ट्र मंडळाचे अध्यक्ष डॉ. एस. एफ. पाटील, उपाध्यक्ष सतीश आगरवाल, सचिव अनिल गुजर यांच्यासह मंडळाचे पदाधिकारी, कर्मचारी व मान्यवर यावेळी उपस्थित होते. केंद्राच्या आयुष मंत्रालयाच्या अनुदानातून डॉ. दादा गुजर माता बाल रुग्णालयाची उभारणी करण्यात आली आहे.



डॉ. दादा गुजर माता बाल रुग्णालयाच्या उद्घाटनप्रसंगी डॉ. मोहन भागवत, बाबा कल्याणी व मान्यवर.

सशक्त समाजनिर्मितीच्या गरजेवर डॉ. भागवत यांनी भर दिला. जगाला आपल्याकडून काही मिळाले पाहिजे. ते देण्याची आपली क्षमता आहे. सबल व सशक्त देश म्हणून आपण उभे राहू शकतो. त्यासाठी समाजात आपलेपणाची, स्नेहलिप्त कार्याच्या भावनेच्या अभिव्यक्तीची गरज आहे. समाजातील प्रत्येक अंग आज स्वस्थ नाही. ते स्वस्थ बनून समाज सशक्त होण्यासाठी अशा स्नेहलिप्त कार्यास बळ देणे गरजेचे आहे. असे कार्य समाजाने सक्षम केले पाहिजे, असे डॉ. भागवत यांनी सांगितले.

सहज व परवडणाऱ्या दरात उपचार मिळणे गरजेचे आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले. आयुर्वेद, ॲलोपॅथी, होमिओपॅथी अशा विविध चिकित्सा पद्धती एकाच ठिकाणी उपलब्ध करून दिल्या गेल्या, तर सुलभ व परवडणाऱ्या दरात उपचार मिळणे शक्य होईल. सध्या उपचारांवर मोठा खर्च करावा लागतो. त्याचा ताण रुग्ण व त्याच्या कुटुंबीयांवर येतो. आयुर्वेदात याचाही विचार झालेला आहे. आयुर्वेदात इलनेसबरोबरच वेलनेसचाही विचार आहे. त्यामुळे अशा विविध शाखांना बळ दिले जाणे गरजेचे आहे, असेही डॉ. भागवत यांनी सांगितले.

बाबा कल्याणी, डॉ. पाटील यांनीही मनोगत व्यक्त केले. प्रकल्पप्रमुख डॉ. सुशीलकुमार देशमुख व प्रकल्प समन्वयक डॉ. प्रणिता जोशी देशमुख यांनी रुग्णालयाबाबतची माहिती दिली. यावेळी आर्किटेक्ट दिलीप काळे, कंत्राटदार श्री. व सौ. राजन वडकर यांचा डॉ. भागवत यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. अनिल गुजर यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. स्नेहल दामले यांनी सूत्रसंचालन केले, तर डॉ. समीर पवार यांनी आभार मानले.